# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०७/२०२५ (बुधवार)**

---

## दिनांक ०६/०७/२०२५ ते दि. ११/०७/२०२५ रोजी पर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील पुलाखाली आणि श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान मंदीर परीसरात ''नो पार्कींग झोन'' घोषीत

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा धापेवाडा (बु) येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक ०६/०७/२०२५ व दि. ११/०७/२०२५ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यादरम्यान अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंड्या आणि पालख्यांचे आगमन होत असते.

मौजा धापेवाडा हे श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान विदर्भाचे पंढरपूर म्हणुन ओळखले जात असुन दरवर्षी मोठया प्रमाणात भाविक दर्शनाकरिता येतात. मंदिरपरीसराचे ठिकाणी भाविक हे आपले स्वत:चे खाजगी २ चाकी, ४ चाकी वाहनाने दर्शनाकरिता येतात व वाहने रस्त्याचे दुतर्फा लावून दर्शनाकरिता निघून जातात त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवून वाहतुकीची कोंडी होवून भाविकांना दर्शना करिता अडचणी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे **दिनांक ०६/०७/२०२५ ते दि. ११/०७/२०२५ रोजी पर्यंत श्री. विठ्ठल** रूक्मिणी **देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथील आषाढी एकादशी निमित्य राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील पुलाखाली व मंदीर परीसरात''नो पार्कींग झोन'' घोषीत करण्यात येत आहे. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ (ई) मौजा धापेवाडा येथील पुलाखाली आणि मंदीर परीसरात स्वत:चे वाहन पार्क करू नये.**

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०१/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री विजय माहुलकर , पोलीस उप अधिक्षक (गुह) नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन कुही अंतर्गत पाचगाव, कुही फाटा, डोंगरगाव, उंद्री, कळमना येथे श्री विजय माहुलकर यांच्या नेतृत्वात पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन कुही येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. कोबिंग ऑपरेशन राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच पाचगाव बसस्टॉप येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.








BE FRESH
BE PURE
BE IMMUNE


NAGPUR RURAL
POLICE
112




## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ९ गुन्हे नोंद एकुण १७,८६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०१/०७/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १७,८६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी** सलीम रहमान शाह, वय. ५१ वर्षे, रा. कोदेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर आणि आरोपी शैलेश धनराज बोरकर, वय.३० वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर** संजय दिनकर खडतकर, वय ४१ वर्ष, रा. वार्ड क्र ०५ पाटणसावंगी, ता. सावनेर, याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे गिरीधर शांतीपनी तांडी, वय ४९ वर्ष, रा. कल्पना भवनच्या, बाजुने खडगाव मानकर यांचा खदानी जवळ नागपुर याचेवर, दत्तराज उर्फ दत्तू देवानंद डोंगरे, वय २८ वर्ष, राहणार वार्ड क्रमांक १२, झोपडपट्टी ब्राह्मणी फाटा, कळमेश्वर आणि दोन महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन नरखेड** येथे तरण नानाजी सोनटक्के, वय ४५

वर्ष, रा. शेंमडा, ता. नरखेड याचेवर **गुन्हा नोंद आहे**, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे रघुवीर रामकिसन बौराशी, वय ६८ वर्षे, रा. वार्ड क्र. ०२ केरडी कन्हान मा.पारशिवनी जि. नागपुर याचेवर **गुन्हा नोंद आहे** अशा ९ **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ९ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर<br>
यांच्या मान्यतेने